# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## कार्यशाळा व्यवस्थापन विभाग

प्रस्ताव मागणी सुचना क्र. १/२०२२-२३ (चतुर्थ मुदतवाढ)

१. **कामाचे नांव** :- मनपाचे विविध विभागातील वाहने व मशिनरीकरीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) चा पुरवठा करणे बाबत..

२. **कामाचे विस्तृत वर्णन** :- मनपाचे विविध विभागातील वाहने जसे फायर फायटींगची वाहने, वॉटर टँकर, ट्रक, फिरता दवाखाना, ॲम्ब्युलन्स्, शववाहीका, जेटींग मशिन, कार, जीप इत्यादी व विविध मशिनरी, जनरेटर सेट इत्यादी करीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) चा आवश्यकतेनुसार पुरवठा करणे बाबत

३. **कामाचा कालावधी** :- **आवश्यकतेनुसार**

४. **प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी** :-
   अ) **प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख** :- दि. २७/२/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत

५. प्रस्ताव उघडण्याचा दिनांक व वेळ :- दि.२७/२/२०२३ दुपारी ४.०० वाजता.
   (शक्य झाल्यास अधीक्षक अभियंता, यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपूर रोड, नाशिक येथे उघडण्यात येतील)

६. प्रस्तावासोबत सादर करावयाचे कागदपत्र :-
   १) इंधन दर हे फर्मचे लेटरहेडवर परिशिष्ट (अ) प्रमाणे नमुन्यामध्ये देण्यात यावे.
   २) शॉप ॲक्ट लायसेंन्स / संस्थेचा नोंदणी दाखला.
   ३) पॅनकार्ड प्रत,
   ४) व्यवसाय कर नोंदणी दाखला/ पुरावा,
   ५) जी.एस.टी. रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट असल्यास.
   ६) इंधन पुरवठा करणेबाबत कंपनीचे अधिकृत वितरक असलेबाबत दाखला

७. <u>अटीशर्ती</u>

१. इंधन पुरवठादार हा कंपनीचा अधिकृत विक्रेता आवश्यक आहे. त्याबाबतचे कागदपत्र प्रस्तावासह सादर करणे आवश्यक राहील.

२. नाशिक मनपा लहान मोठी वाहने व इतर मशिनरी यासाठी लागणारे इंधनाचा पुरवठा मागणीनुसार वेळेत करावा लागेल. तसेच सदर मनपाचे मोठया प्रकारचे वाहनांमध्ये इंधन भरण्यासाठी वाहने उभी करण्यासाठी जागा असणे आवश्यक आहे. मनपा वाहने इंधन भरण्यासाठी पंपावर आल्यावर वाहनांमुळे रहदारीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता इंधन पुरवठादारास घ्यावी लागेल.

३. इंधन पुरवठादाराने मनपा वाहनांकरीता प्राधान्यांने इंधन पुरवठा करणे आवश्यक राहील.

४. इंधन जसे पेट्रोल/ डिझेल दरात बाजारभावाप्रमाणे वाढ/ कमी झाल्यास त्या प्रमाणे डिझेल/पेट्रोल देणे पुरवठादारावर बंधनकारक राहील.

५. पेट्रोल/ डिझेल चा पुरवठा केल्यानंतर दर आठवडयाचे देयक सादर करावे लागेल. सदर देयक अदा करणेसाठी किमान १० दिवसांचा कालावधी लागेल. मनपाकडून पुरवठादार/ पंपचालक यांना काही अपरिहार्य कारणास्तव देयक अदा करणेस विलंब झाल्यास मनपा कुठलेही विलंब शुल्क अथवा व्याज देणार नाही.

६. पुरवठादाराने देयक सादर करतेवेळी देयकात दिनांक, वाहन क्रमांक, पावती क्रमांक, इंधन प्रमाण, दर व रक्कम असे मागणीपत्रात नमूद करणे बंधनकारक राहील. वाहनाच्या टाकीऐवजी ड्रममध्ये इंधन द्यावयाचे झाल्यास सदर मनपाचे प्लॅन्ट व मशिनरीकरीता इंधन देतेवेळी प्लॅन्ट/विभागाचे नांव, कर्मचारी नांव इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक राहील.

७. मनपाकडून देय असलेल्या सदर खरेदी केलेल्या इंधनाचे देयकाची रक्कम हि आर.टी.जी.एस. व्दारे अदा करणेत येईल.

८. पेट्रोल/ डिझेल पुरवठा करणेकामी मनपाकडून छापील पावती पुस्तक देण्यात येईल. सदर पंपावर एक स्वतंत्र रजिष्टर ठेवून त्यात वाहन क्रमांक, पावती क्रमांक, इंधन प्रमाण, दर व रक्कम वाहनचालकाचा कर्मचारी क्रमांक व नांव इत्यादी बाबी नमूद करणे आवश्यक राहील.

९. सदर कामी र.रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल.

१०. इंधन पुरवठादार/ पंपचालकाची सेवा अथवा दर्जा व गुणवत्ता बाबत तक्रार प्राप्त झाल्यास व ते सिध्द झाल्यास मनपाकडून त्वरीत इंधन खरेदी बंद करणेत येईल.

११. पुरवठादार पंपचालकास भविष्यात इंधन पुरविणे शक्य नसल्यास त्यांनी मनपास किमान एक महिना आगाऊ लेखी सुचना, अवगत करणे आवश्यक राहील.

१२. पंपावरील सर्व प्रकारच्या सुरक्षिततेबाबतची सर्व जबाबदारी इंधन पुरवठादार पंपचालकाची राहील.

१३. मनपाचे कार्यशाळा व्यवस्थापन विभाग, पंचवटी येथे एच.पी.सी.एल. कंपनीचा डिझेल पंप आहे. तथापी कंपनीचे थेट खरेदीचे दर जास्त असल्याने मनपा बाहेरी पंपावरुन सदरचा इंधन पुरवठा करुन घेणार आहे. त्यामुळे भविष्यात सदर एच.पी.सी.एल. कंपनीचे थेट इंधन खरेदीचे दर कमी झाल्यास बाहेरी पंपावरुन खरेदी करणेत येणारे डिझेलची खरेदी तात्काळ बंद करणेत येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार एकुण घेतली जाणार नाही.

१४. नाशिक शहरातील एकापेक्षा जास्त इंधनपुरवठादारांनी स्वारस्य दाखविल्यास सदरचे काम मनपाचे आवश्यकतेनुसार विभागून देण्यात येईल.

१५. करारनाम्यातील अटीशर्ती तसेच त्या व्यतिरिक्त बाबींसंदर्भात भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास मा. आयुक्त सो., मनपा यांचा निर्णय अंतिम राहील.

१६. सदर कामाबाबत अधिक माहिती कार्यशाळा व्यवस्थापन विभाग, राजीव गांधी भवन, मनपा, नाशिक या ठिकाणी कार्यालयीन वेळेत घेता येईल.

१७. आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना कोणतेही कारण न देता प्राप्त प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार आहे.

सही/-

अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

# परिशिष्ट (अ)

दिनांक     /     /२०२३

प्रति,
मा. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी)
कार्यशाहा व्यवस्थापन विभाग, मनपा, नाशिक

विषय:- मनपाचे विविध विभागातील वाहने व मशिनरीकरीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) चा पुरवठा करणे बाबत..

संदर्भ:- प्रस्ताव मागणी सुचना क्र. १/२०२२-२३ (चतुर्थ मुदतवाढ)

महोदय,

उपरोक्त विषयांकीत नाशिक मनपाचे विविध विभागातील वाहने व मशिनरीकरीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) चा पुरवठा करणे बाबत संदर्भिय प्रस्ताव मागणी सुचना क्र. १/२०२२-२३ (चतुर्थ मुदतवाढ) चे अटीशर्ती या आम्ही वाचल्या असुन त्या आम्हाला मान्य आहेत.

त्यानुसार आम्ही सदर कामासाठी खालील प्रमाणे दर सादर करत आहोत.

| अ.क्र. | इंधन प्रकार | दर |
|---|---|---|
| १ | पेट्रोल | कंपनीने दैनंदिन ठरवून दिलेल्या दरावर सुट - |
| २ | डिझेल | कंपनीने दैनंदिन ठरवून दिलेल्या दरावर सुट - |

सदर दरासोबत आम्ही आमचे इंधन पंपाबाबत फर्मचे प्रस्ताव सुचनेमध्ये नमूद प्रमाणे कागदपत्र सोबत जोडले आहे.

स्वाक्षरी व शिक्का

नाशिक महानगरपालिका, नाशिक

कार्यशाळा व्यवस्थापन विभाग

प्रस्ताव मागणी सुचना क्र. १/२०२२-२३ (चतुर्थ मुदतवाढ)

नाशिक महानगरपालिकेचे विविध प्रकारची वाहने तसेच मशिनरी इत्यादीकरीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) पुरवठा करणेकामी नाशिक शहरातील अधिकृत विक्रेते (पेट्रोल/ डिझेल पंपधारक) यांचेकडून प्रस्ताव मागविणेत येत आहे.

१. **कामाचे नांव** :- मनपाचे विविध विभागातील वाहने व मशिनरीकरीता इंधन (डिझेल/ पेट्रोल) चा पुरवठा करणे बाबत..
२. सदर इंधन पुरवठा प्रस्ताव मागणी बाबत सविस्तर माहिती व अटीशर्ती मनपाचे www.nmc.gov.in या संकेतस्थळावर देण्यात आलेली आहे.
३. इच्छुक पंपधारकांनी प्रस्ताव मागणी सुचना (स्वाक्षरी व शिक्क्यासह ), सुचनेत नमूद आवश्यक कागदपत्र व परिशिष्ट अ मध्ये दर भरुन (स्वाक्षरी व शिक्क्यासह ) बंद पाकीटात निम्न स्वाक्षरीकार यांचे नांवे व कार्यालयात मुदतीत सादर करावे.
४. प्रस्ताव सादर करण्याची अंतिम तारीख :- दि. २७/०२/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत
५. आयुक्त तथा प्रशासक, नाशिक महानगरपालिका, नाशिक यांना कोणतेही कारण न देता प्राप्त प्रस्ताव स्विकारण्याचा अथवा कोणत्याही किंवा सर्व प्रस्ताव नाकारण्याचा अधिकार आहे.

सही/-

अधीक्षक अभियंता (यां.)

नाशिक महानगरपालिका, नाशिक